जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक ७६८ दिनांक - २८/१०/२०२३**

सहकारनगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## खुनाच्या प्रयत्नातील २ सराईत गुंड सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर यांचेकडुन जेरबंद

दिं.२५/१०/२०२३ रोजी रात्रौ ०८/३० वा.चे सुमारास बालाजीनगर येथील शिळीमकर पेट्रोल पंप जवळ फिर्यादी यांना जुन्या भांडणाच्या कारणा वरुन भांडणात मध्यस्थी करतोस काय,जास्त शहाणा झालास का,याला मारून टाकू,याला आता संपवायचाच असे बोलून बबलू कोठारी,सल्या शेख,सनी जाधव यांनी संगनमत करुन जिवे मारण्याच्या हेतुने धारदार हत्याराने वार केले व हातातील हत्यारे, बांबू हवेत फिरवून आजूबाजूच्या लोकांसमोर आम्हीच इथले भाई आहोत.कोणी नडला तर त्याला तोडणारच असे जोरजोराने ओरडून दहशत केली व त्यानंतर ते सर्वजण गाडीवर बसून तेथून निघून गेले.त्याबाबत सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं २७७/२०२३ भा.द.वि.कलम ३०७,३२३,५०४,५०६,आर्म ॲक्ट ४ (२५), मपोका.कलम ३७(१)(३) सह १३५ क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे

दिं.२६/१०/२०२३ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे सहकारनगर पोलीस ठाणे येथे हजर असताना **पोलीस अंमलदार सुशांत फरांदे** यांच्या गोपनीय बातमीनुसार आरोपी वैभव उर्फ बबलू कोठारी यास अरण्येश्वर मंदिरा जवळुन ताब्यात घेवुन दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

तसेच याच गुन्हयातील फरार असलेला सराईत गुन्हेगार सलमान उर्फ सल्या शेख याचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार **अमोल पवार व निलेश शिवतरे** यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की सदर गुन्हयांत फरार असलेला आरोपी नामे सल्या शेख हा घातक हत्यारासह के.के.मार्केट येथील पेट्रोल पंपाशेजारी कोणाची तरी वाट पाहत असुन तो काहीतरी गुन्हा करण्याच्या इरादयाने थांबला आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे सहकारनगर पोलीस स्टेशन यांना कळविली असता त्यांनी लागलीच पो.उपनिरी.राहुल खंडाळे व अंमलदार यांची टीम तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करून बातमीचे ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले त्यानुसार सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावुन छापा टाकुन आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव सलमान ऊर्फ सल्ल्या हमीद शेख वय २४ वर्षे रा.चैत्रबन वसाहत गल्ली नंबर ११,माताजी सुपर मार्केट समोर अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी पुणे असे सांगितले त्याची झडती घेता त्याचे कंबरेला एक लोखंडी हत्यार मिळून आल्याने त्याच्यावर सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं २७८/२०२३ प्रमाणे भारतीय हत्यारबंदी कायदा कलम ४ सह २५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याच्याकडे सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं २७७/२०२३ दाखल गुन्हयाच्या अनुशंगाने विश्वसात घेवुन चौकशी करता त्याने सदरचा गुन्हा हा त्याचे साथीदार बबलू कोठारी,सनी जाधव यांच्यासह केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपी सलमान ऊर्फ सल्ल्या शेख हा आदेश बिरामणे टोळीचा सदस्य असुन त्याच्यावर खुनाचा प्रयत्न,जबरी दुखापत,मारामारी अशा प्रकारचे एकुण ७ गुन्हे सहकारनगर व भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत तसेच वैभव ऊर्फ बबलू कोठारी त्याच्यावर मारामारीचा १ गुन्हा सहकारनगर पोलीस स्टेशन येथे दाखल आहे.सदर गुन्हयाचा अधिक तपास पोलीस उप-निरीक्षक राहुल खंडाळे करीत आहेत.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ श्रीमती स्मार्तना पाटील, सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग नारायण शिरगावकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सहकारनगर पोलीस स्टेशन संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, सहा.पोउपनिरी बापु खुटवड, पोलीस अंमलदार अमोल पवार,सुशांत फरांदे,निलेश शिवतारे,संजय गायकवाड,महेश मंडलिक,सागर सुतकर,बजरंग पवार,नवनाथ शिंदे,भुजंग इंगळे,सागर कुंभार,विशाल वाघ यांनी केली आहे.

